**सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती/फ्रि-शिपची प्रलंबित रक्कम अदा करण्याबाबत उपाययोजना.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : -भासशि-२०१७/प्र.क्र.१८९/का-१२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ मे, २०१८.

**वाचा :**

१. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.आविवि-२०१७/प्र.क्र.४०/का-१२, दि.१९.०८.२०१७.

२. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.भासशि-२०१७/प्र.क्र.१८९/का-१२, दि.११.१२.२०१७.

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रिया राबविण्याबाबत सर्व संबंधित विभागांनी अधिसूचना निर्गमित केलेल्या आहेत. आदिवासी विकास विभागाने दिनांक २७.०७.२०१७ च्या अधिसूचनेनुसार सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून संदर्भीय दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, परीक्षा फी प्रदाने, निर्वाह भत्ता, विद्यावेतने विषयक योजनांतर्गत लाभ मिळण्याकरीता अर्ज करण्यापासून ते रक्कम लाभार्थ्यांच्या बॅन्क खात्यात जमा करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रिया, माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केलेल्या राज्य स्तरीय महा-डिबीटी पोर्टलवर करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

२. दरम्यान, सदर महाडिबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी अर्जाची नोंद केल्यानंतर त्यांना अदा करावयाचे लाभ प्रदान करण्याबाबतची ऑनलाईन प्रक्रिया महाडिबीटी एजन्सी मार्फत प्रगतीत असल्याने, पात्र विद्यार्थ्यास महाविद्यालयात फी भरण्यास अडचणी निर्माण होवू नयेत म्हणून, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात पहिल्या सहामाहीसाठी शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काच्या ५० % च्या ६० % इतकी रक्कम विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर बंधपत्र घेवून जमा करण्याचा निर्णय संदर्भीय दिनांक ११.१२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. तसेच महाडीबीटी प्रणालीवर शिष्यवृत्तीच्या योजनांचे लाभ अदा करण्याच्या दृष्टीने, सदर प्रणाली अंतिम टप्प्यापर्यंत पुर्णत: कार्यन्वित झालेली नसल्याने, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मंजूर करावयाच्या शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेचा पूर्ण लाभ विभागाने यापूर्वी विकसित केलेल्या व कार्यरत असलेल्या ई-विकास ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्याचा देखील निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सर्व संबंधित विभागांमार्फत सन २०१७-१८ मधील पात्र विद्यार्थ्यांच्या प्राप्त अर्जांपैकी ५० टक्क्यापेक्षा जास्त अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही माहे मार्च, २०१८ अखेरपर्यंत करण्यात आली.

३. परंतु, काही शैक्षणिक संस्थांकडील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती/फ्रि-शिपचे अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे मुदतीत सादर होवू न शकल्याने संबंधित शैक्षणिक संस्थांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम प्राप्त होवू शकली नाही. तसेच काही शैक्षणिक संस्थांकडील विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडे विलंबाने सादर करण्यात आल्याने त्यावरील देय रक्कम शैक्षणिक संस्थांना प्राप्त झालेली नाही. त्याचबरोबर सन २०१७-१८ हे शैक्षणिक वर्ष संपुष्टात आल्याने या वर्षातील शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम आता विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा केल्यास व अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांनी सदर रक्कम महाविद्यालयात जमा न केल्यास शैक्षणिक संस्थांचे नुकसान होणार असल्याने, काही शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या महाविद्यालयांत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम थेट महाविद्यालयांना अदा करण्याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. त्या मधील रिट याचिका क्र.४०८/२०१८ या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठात दिनांक १६.४.२०१८, दिनांक २३.४.२०१८ व दिनांक २६.४.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये, सन २०१७-१८ मधील महाविद्यालयांतील प्रवेशित मागासप्रवर्ग व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अदा करण्यासंबधी उपाययोजना करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिले. त्यानुसार, मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक ०३.०५.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये सन २०१७-१८ मधील महाविद्यालयांतील प्रवेशित मागासप्रवर्ग (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग) व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अदा करण्यासंबधी उपाययोजना करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यास अनुसरुन शासन निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती. याबाबत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

(१) केवळ सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये, ज्या महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशित अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अद्याप प्राप्त होवू शकलेली नाही, अशा महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांना, त्यांच्याकडील प्रवेशित पात्र अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांपैकी आज अखेर लाभ अदा केलेले विद्यार्थी वगळुन, उर्वरीत विद्यार्थ्यांची अनुज्ञेय/पात्र अभ्यासक्रमांसाठी देय होणारी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेला खालील अटी/शर्तीवर ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.:-

(i) शासनाने विहीत केल्याप्रमाणे संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेने त्यांच्याकडील प्रवेशित विद्यार्थ्यांचे परिपूर्ण अर्ज तपासून, प्राचार्यांच्या हमीपत्रासह (परिशिष्ट "अ" प्रमाणे) विभागाच्या संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील. (असे अर्ज प्राचार्यांच्या हमीपत्रासह यापुर्वी सादर केलेले असतील तर ते पुन्हा सादर करण्याची आवश्यकता नाही.)

(ii) प्रत्येक विद्यार्थ्यांचे आधार व्हेरीफिकेशन झालेले असल्याचे संबंधित महाविद्यालयाने प्रमाणित करावे.

(iii) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये संबंधित विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक संस्थेने/महाविद्यालयाने शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क घेतलेले नसल्याचे हमीपत्र शैक्षणिक संस्थेने/ महाविद्यालयाने विभागाच्या संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडे अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

(iv) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेने सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची विभागाच्या संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी तपासणी करुन, ज्या विद्यार्थ्यांना लाभ

अदा केलेले आहेत, असे विद्यार्थी वगळुन उर्वरीत पात्र विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालय /शैक्षणिक संस्थेस दि.२० जून, २०१८ पर्यंत अदा करावी.

(२) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील पात्र विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता) च्या रक्कमेतील निर्वाह भत्याची रक्कम संबंधित पात्र विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यात यावी.

(३) आदिवासी विकास विभागाच्या शिष्यवृत्ती व फ्री-शिप योजनांच्या संदर्भात **महाविद्यालय, शैक्षणिक संस्था व विद्यापीठांची जबाबदारी :-**

(i) विद्यार्थ्यांची सर्व प्रकारची पात्रता (प्रवेश, जात, उत्पन्न, रहिवास, मागील वर्षात उत्तीर्ण झाल्याची खात्री, आधार, बॅक तपशील इ.) सर्व मुळ कागदपत्रे तपासून खात्री करण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्याची राहील.

(ii) महाविद्यालयाचे प्राचार्यानी महाविद्यालयाची मान्यता, संलग्नता, अभ्यासक्रमाची मान्यता, प्रवेश क्षमता आणि सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्य केलेले शुल्क (Fee structure) याची खात्री करणे अनिवार्य राहील.

(iii) वरीलप्रमाणे विद्यार्थी व महाविद्यालयाच्या पात्रतेची खात्री करुन पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज तातडीने मंजूर करुन ते दि. ५ जून, २०१८ पर्यंत संबंधित प्रकल्प अधिकारी यांचेकडे पाठविण्याची/फॉरवर्ड करण्याची जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्यास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील.

(iv) सन २०१७-१८ मधील ज्या विद्यार्थ्याची शिक्षण शुल्क-परिक्षा शुल्काची रक्कम महाविद्यालयांना अदा केली जाईल, ती या शैक्षणिक वर्षात यापूर्वी संबंधित विद्यार्थी वा महाविद्यालयाला दिलेली नाही, तसेच अशा विद्यार्थ्यांना वा महाविद्यालयांना त्याच कालावधीसाठी ती पुन्हा दिली जाणार नाही, तसेच शिष्यवृत्ती/फ्री शिप योजनेअंतर्गत दुबार लाभ प्रदान होणार नाही, याबाबत संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी दक्षता घ्यावी.

(v) संबंधित महाविद्यालयांच्या पात्रतेबाबतची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील आणि त्याबाबतचे अभिलेख सादर करण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयांची राहील.

(५) **प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांची जबाबदारी** :-

(i) प्रस्तुत शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी, प्रकल्प अधिकारी यांनी त्यांच्या परिक्षेत्रातील महाविद्यालयांतील पात्र विद्यार्थ्यांपैकी सन २०१७-१८ या वर्षासाठी व त्यापुर्वीच्या वर्षामध्ये लाभ दिलेल्या विद्यार्थ्यांचा तपशिल तात्काळ संबंधित महाविद्यालयांना अवगत करावा.

(ii) संबंधित महाविद्यालयाने खात्री व पडताळणी करुन सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज हे, संबंधित विद्यार्थ्याचे जात प्रमाणपत्र, आवश्यक तेथे वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार, मागील वर्षाचे उत्तीर्ण प्रमाणपत्र / पुरावा, उत्पन्न दाखला, व महाविद्यालयाचे हमीपत्र (परिशिष्ट-अ, हार्ड कॉपी) इ.कागदपत्रे तपासून दोन आठवड्यात मंजूर करण्याची दक्षता संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी घ्यावी.

(iii) शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व निर्वाह भत्त्याचे देयक कोषागार कार्यालयास सादर करण्यात यावेत. कोषागार कार्यालयामार्फत प्रकल्प अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी यांच्या खात्यावर देयकांची रक्कम जमा झाल्यानंतर संबंधित प्रकल्प अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी यांच्या खात्यातून देयकाच्या रक्कमेतील शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालय/

शैक्षणिक संस्था/ विद्यापीठाच्या बँक खात्यावर आणि निर्वाह भत्त्याची रक्कम ईसीएसव्दारे संबंधीत बँकेकडे विद्यार्थ्याच्या नावासह आधार संलग्न बँक खात्यात जमा करणेसाठी दोन आठवड्यात पाठविणे बंधनकारक राहील. त्यानंतर संबंधित बँका, संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्था/विद्यापीठाच्या बँक खात्यावर शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम व संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर निर्वाहभत्त्याची रक्कम तात्काळ जमा करतील, अशा सूचना सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी द्याव्यात.

(iv) जी देयके कोषागार कार्यालयात सादर करण्यात आलेली आहेत, परंतु त्याची अदायगी अद्याप होवू शकलेली नाही, अशा देयकांबाबत संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी या शासन निर्णयातील अटी शर्तींची पूर्तता झाल्याची खातरजमा करुनच वरील अ.क्र. (iii) प्रमाणे कार्यवाही करावी.

(iv) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये ज्या विद्यार्थ्यांना या शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी अदा केलेल्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क-परीक्षा शुल्क व निर्वाहभत्त्याचा तपशिल आणि प्रस्तुत शासन निर्णयानुसार अदा करण्यात येणाऱ्या लाभाच्या तपशिलाचे सर्व अभिलेखे जतन करण्याची जबाबदारी ही संबंधित प्रकल्प अधिकारी यांची राहील.

(v) सन २०१७-१८ मधील ज्या विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क-परिक्षा शुल्काची रक्कम महाविद्यालयांना अदा केली जाईल, ती या शैक्षणिक वर्षात यापुर्वी संबंधित विद्यार्थी वा महाविद्यालयाला दिलेली नाही, तसेच अशा विद्यार्थ्यांना वा महाविद्यालयांना त्याच कालावधीसाठी ती पुन्हा दिली जाणार नाही, तसेच शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजनेअंतर्गत दुबार लाभ प्रदान होणार नाही, याबाबत संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

(v) या शासन निर्णयातील तरतुदी केवळ सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी व त्यापुर्वीच्या वर्षातील प्रलंबित अर्जासाठी लागू राहतील.

४. सदरहू शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०५१९१३०१५३६३२४ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2018.05.19 13:00:07 +05'30'

**(सु.ना.शिंदे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (सा.न्या.व वि.स.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई
५. मा.विधान परिषद/विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई

६. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७. अमुस, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१६.आयुक्त,आदिवासी विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१७.सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१९.सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास.
२०.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२१.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेय/लेखा परिक्षा) महाराष्ट्र ½,मुंबई/नागपूर.
२२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२४.निवडनस्ती (का-१२)

**"परिशिष्ट-अ"**

**(शासन निर्णय क्र. भासशि-२०१७/प्र.क्र.१८९/का-१२, दिनांक १९ मे, २०१८ चे सहपत्र)**

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामधील शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. ची अनुज्ञेय रक्कम महाविद्यालयाच्या बँक खात्यावर मिळण्यासाठी

## महाविद्यालयाने द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond)

(I) श्री. ------------------------------------------------------- या अर्जदाराने सोबतच्या बंधपत्रात (Indemnity Bond) नमूद केलेली सर्व माहिती, त्याच्या कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न, तो सध्या शिकत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, त्याचे वसतिगृह, वसतिगृहा बाहेर राहण्याची माहिती शुल्करचना, जातीचे प्रमाणपत्र इ. तपशिल त्याच्या मुळ कागदपत्रांवरुन पूर्णपणे तपासण्यात आला असून, अर्जात नमूद केलेला तपशिल बरोबर आहे. त्यानुसार, मी, श्री / श्रीमती ------------------------------------------------------------------- (प्राचार्याचे नाव) ------------------------------------------------------------------- या शैक्षणिक संस्थेच्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत असुन, त्या अधिकारात उपरोक्त विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क इतर शुल्क मंजूर करण्याकरीता शिफारस करीत आहे.

(II) मी निम्नस्वाक्षरीत हमी देतो की, अर्जदाराची शिक्षण शुल्क व इतर शुल्काची रक्कम जी महाविद्यालयाकडे सुपूर्द केलेली आहे, ती ज्या प्रयोजनासाठी दिलेली आहे, त्या विशिष्ट प्रयोजनासाठी त्याचा विनियोग करीन आणि त्याबाबीचे हिशोब ज्या प्राधिकाऱ्याने ही तरतूद सुपूर्द केलेली आहे, त्या प्राधिकाऱ्याकडे नियमितपणे पाठवेन. विद्यार्थी महाविद्यालय सोडून गेल्यास किंवा त्याने विनापरवानगी अभ्यासक्रमात बदल केल्यास किंवा अन्य कोणत्याही अनियमिततेमुळे त्याचा प्रवेश रद्द झाल्यास, त्यास मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती / शिक्षण फी, परिक्षा फी व इतर शुल्काची रक्कम सरकारी लेख्यात जमा झाल्याशिवाय त्याचा शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला जारी करणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य या नात्याने माझ्याकडे राहील.

(III) विद्यार्थ्याच्या अर्जामध्ये नमूद केलेली माहिती, अर्जदाराने दिलेल्या मुळ कागदपत्राचे आधारे मी तपासलेली आहे. तसेच अर्जदारानी सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती तपासलेल्या असून सादर केलेल्या कागदपत्रामध्ये कोणताही बदल, खाडाखोड, दुरुस्ती वा फेरफार आढळून आलेला नाही.

(IV) मी निम्नस्वाक्षरीत प्रमाणित करतो की, अर्जदार हा आमचे महाविद्यालयामधील नियमित विद्यार्थी आहे. त्याने कोणत्याही अन्य महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला नाही, तसेच त्याची सरासरी उपस्थिती ७५% पेक्षा अधिक आहे. तसेच सदर विद्यार्थ्याकडून महाविद्यालयाने कोणतेही शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर अनुज्ञेय शुल्क पोटी रक्कम घेतलेली नाही.

(V) आमचे महाविद्यालय हे मान्यता प्राप्त आहे, ते अनुदानित / विनाअनुदानित आहे, मान्य झालेले अभ्यासक्रम हे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्यता दिलेले आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ही सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या मान्यतेनुसारच असुन, त्या प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून मागासवर्गीय

विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित सक्षम कार्यालयास फॉरवर्ड केले आहेत. त्यांची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व इतर शुल्क सुध्दा, संबंधित सक्षम प्राधिकारी / विद्यापीठ यांनी मान्य केल्याप्रमाणेच असून ती अवास्तव किंवा अवाजवी नाहीत. शासन / विद्यापीठ / सक्षम प्राधिकारी यांचे प्रचलित नियम व अटी यांचे पालन करुन व त्यामधील नियम, अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यार्थ्याचा अर्ज योग्य व नियमानुसार असून, त्याची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची देय रक्कम, महाविद्यालयाच्या बॅक खात्यावर जमा होणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. त्यामध्ये अनियमितता उणीवा व गैरप्रकार झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही महाविद्यालयाची असेल.

जावक क्रमांक --------------

दिनांक ---------------

ठिकाण ------------------

प्राचार्यांची स्वाक्षरी-------------------------------------

संपूर्ण नाव -------------------------------------

महाविद्यालयाचा शिक्का